उपवनसंरक्षक, चिखलदरा
क्र. ... 4225
दिनांक 31/3/06

क्रमांक/विमाका/अम/जाहि/२००६/९९७
विभागीय माहिती कार्यालय, महाराष्ट्र शासन,
अमरावती, दिनांक २९ मार्च २००६

प्रति,
उपवनसंरक्षक,
पूर्व मेळघाट वनविभाग,
**चिखलदरा, जिल्हा अमरावती**

विषय :- जाहिरात देयकाचे प्रदान होणेबाबत...
संदर्भ :- आपले पत्र क्रमांक/४१७१/२००५-२००६, दि. २३/०३/२००६ **(एकूण २० पत्रे)**

वरील संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे.

आर्थिक वर्ष २००४-२००५ या वर्षातील वर्गीकृत जाहिरातीचे देयके संबंधित वृत्तपत्रांच्या संपादकांना २३ मार्च २००६ रोजी परत करण्यात आली आहेत. असे आपल्या वरील संदर्भिय पत्रावरुन दिसून येते. कलिंग भारती, भुवनेश्वर, या वृत्रपत्राला या कार्यालयातर्फे जाहिरात वितरीत करण्यात आली नाही.

वास्तविक आपल्या कार्यालयातर्फे पाठविण्यात आलेली प्रत्येक जाहिरात आपण सूचविलेल्या आकारात प्रसिद्ध होईलच असे नाही. जाहिरातीचा मसूदा पाहून जाहिरात प्रसिद्धीच्या आकारात आदेश देतांना बदल करावा लागतो. आदेशात नमूद केलेल्या आकारात संबंधितांनी जाहिरात प्रसिद्ध करावी, असे निर्देश दिलेले असतात. पण बरीचशी वृत्तपत्रे ही जिल्हास्तरीय व फोटो ऑफसेट, ऑफसेटवर कंपोज होत असल्याने त्यात संपादकांकडून बदल केला जातो. अशावेळी त्यांच्याकडून हा बदल दिलेल्या जाहिरातीच्या आदेशापेक्षा ३० टक्के अधिक पर्यत अभिप्रेत आहे.

जाहिरात आपण सूचविलेल्या आकारात वा या कार्यालयाने दिलेल्या आकारात प्रसिद्ध केल्यास बरेचदा फॉंड कमी असल्याने जाहिरात प्रसिद्धीचा हेतू साध्य होत नाही. त्यामुळे दिलेल्या आकारापेक्षा जास्त आकारात वृत्तपत्रे जाहिरात प्रसिद्ध करतात. आपणाकडून प्रसिद्धीसाठी दिलेल्या जाहिरातीचे महत्व लक्षात घेवून वृत्तपत्रांच्या संपादकांनी प्रसिद्ध केलेल्या जाहारितीच्या देयकाचे भुगतान आपल्या स्तरावर निर्णय घेवून निकाली काढावेत.

कळावे

( प्रभाकर पवंडे )
**उपसंचालक (माहिती)**
**अमरावती**